प्रेस नोट दिनांक १२/०६/२०१९

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

## नजर चुकीने वाहनांची अदला-बदल झालेल्या वाहन मालकाचा शोध घेवून दोन्ही वाहने मालकांचे ताब्यात परत.

दि. ०९.०६.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित मिठगंज पोलीस चौकी येथे रात्रपाळी कर्तव्यावर डयुटी अंमलदार म्हणुन पो.ना. २३४७ पिसाळ हजर असताना, इसम नामे विलास पुनमचंद जैन रा. शंकरशेठ रोड, कृष्णा सोसायटी यांनी येवून कळविले की, त्यांची होन्डा कंपनीची ॲक्टीव्हा एम.एच.१२.एफ.डी. ९५३४ ही गुरूवार पेठ येथील पवार टेलर्स दुकानासमोर पार्क केली असता, ती कोणीतरी घेवून गेलेले आहेत. सदरवेळी नमुद कर्मचारी व बीट मार्शलवरील कर्मचारी पो.शि. गव्हाणे व पोशि कांबळे हे घटनास्थळी गेले असता, सदर ठिकाणी तक्रारदार यांचे वर्णनाप्रमाणेच होन्डा ॲक्टीव्हा एम.एच.१२.जी.पी.५५५० ही पार्क असल्याचे दिसले.

सदरवेळी बीट मार्शल कर्मचारी यांनी नाकाबंदी क्राईम ब्रन्च या ॲपवरून सदर गाडी मालकाचा नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांचेशी संपर्क केला असता, त्यांना तक्रारदार यांचे गाडीवबाबत चौकशी करता, त्यांनी नजर चुकीमुळे तक्रारदार यांची गाडी घेवून आल्याचे सांगितले. सदर व्यक्ती शाहबाज मोहमंद चाबुकस्वार हे तक्रारदार यांची गाडी घेवून चौकीस आले असता, त्यांनी सांगितले की एकाच कलरच्या गाडी असल्यामुळे चेंज झाली असल्याचे सांगितले. तक्रारदार विलास पुनमचंद जैन यांची होन्डा ॲक्टीव्हा गाडीबाबत योग्य ती खातरजमा करून त्यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे. सदर झालेला प्रकार हा दोन्ही गाडया एकाच कंपनीच्या व एकाच रंगाच्या असल्यामुळे नजरचुकीने गाडीस चावी लागल्याने झाला असल्याचे चौकशी दरम्यान दिसून आलेले आहे.

